आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२४ मे २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी भारताची आणखी तीन शिष्टमंडळं परदेशी रवाना

- नैऋत्य मौसमी पाऊस वेळेआधीच आठ दिवस केरळमध्ये दाखल

- जम्मू काश्मीरमध्ये शहीद झालेले अहिल्यानगरचे सुपूत्र जवान संदीप गायकर यांच्या पार्थिवावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार

- मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीत भारताच्या किदम्बी श्रीकांतचा अंतिम फेरीत प्रवेश,

**आणि**

- जानुझ कुसोसिन्की मेमोरियल मीट स्पर्धेत भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्राला रौप्य पदक

**<><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी सात बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं वेगवेगळ्या देशांना भेटी देत आहेत. याअंतर्गत भाजपाचे खासदार बैजयंत पांडा, काँग्रेस खासदार शशी थरुर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वातली तीन सर्वपक्षीय शिष्टमंडळं आज पहाटे परदेशी रवाना झाली. बैजयंत पांडा यांच्या नेतृत्वातलं भारताचं शिष्टमंडळ नुकतंच बाहरेन इथं पोहोचलं.

दरम्यान, द्रमुक खासदार कनिमोळी करुणानिधी यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं रशियाची राजधानी मॉस्को इथं बातमीदारांशी संवाद साधला. यानंतर हे शिष्टमंडळ स्पेन, ग्रीस, स्लोव्हेनिया, लाटवियाला भेट देणार आहे. जनता दलाचे खासदार संजय झा यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं जपानची राजधानी टोकियो इथं ब्राझील, ऑस्ट्रेलिया, कोलंबिया, ग्रीस आणि दक्षिण कोरियाच्या राजदूतांशी संवाद साधला. शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं दहशतवादाविरुद्ध

भारताच्या भूमिकेवर भर देण्यासाठी संयुक्त अरब अमिराती मधल्या उच्चाधिकाऱ्यांबरोबर अनेक उच्चस्तरीय बैठका घेतल्या.

**<><><><>**

भारताच्या दहशतवादाविरुद्धच्या लढाईला आणि स्वतःचं संरक्षण करण्याच्या अधिकाराला जर्मनीनं दिलेल्या पाठिंब्याबद्दल परराष्ट्र मंत्री डॉ एस जयशंकर यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. बर्लिन इथल्या ‘जर्मन कौन्सिल ऑन फॉरेन रिलेशन्स’ या विषयावरील परिसंवादाला संबोधित करताना ते बोलत होते. जर्मनीनं अगदी सुरुवातीलाच भारतामध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला असून जर्मनीचे परराष्ट्र मंत्री जोहान वाडेफुल यांनी भारताचा स्वतःचं संरक्षण करण्याचा अधिकार मान्य केला आहे, जर्मनीच्या या स्पष्ट भूमिकेमुळे भारताला प्रोत्साहन मिळालं आहे, असं जयशंकर यावेळी म्हणाले.

**<><><><>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधतील. हा या कार्यक्रमाचा १२२ वा भाग असेल. या कार्यक्रमाचं आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व प्रसारण सेवा, युट्यूब वाहिन्या, संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एअर या मोबाईल ॲपवरून थेट प्रसारण होईल. आकाशवाणीवर मूळ प्रसारणानंतर लगेचच या कार्यक्रमाच्या प्रादेशिक भाषेतल्या अनुवादाचं प्रसारण होईल.

**<><><><>**

नवी दिल्ली इथं निति आयोगाच्या १०व्या प्रशासकीय परिषदेच्या बैठकीचं अध्यक्षपद प्रधानमंत्री नरेंद्र मोदी भूषवत आहेत. 'विकसित भारतासाठी विकसित राज्ये २०४७' अशी या वर्षीच्या बैठकीची संकल्पना आहे. राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री, लेफ्टनंट गव्हर्नर, केंद्रीय मंत्री आणि नीती आयोगाचे उपाध्यक्ष, सदस्य आणि मुख्य कार्यकारी अधिकारी या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. देशाला विकासाच्या दृष्टीनं भेडसावणाऱ्या समस्या आणि भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी राज्यांची भूमिका याबाबत बैठकीत बहुमत आजमावलं जाणार आहे.

**<><><><>**

लोकसभेतले विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी आज पुंछ इथं पाकिस्तानच्या गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या आणि बाधित झालेल्यांच्या कुटुंबियांची भेट घेणार आहेत. जम्मू आणि काश्मीरमध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर गांधी इथं दुसऱ्यांदा भेट देत आहेत. त्यांच्याबरोबर पक्षाचे वरिष्ठ नेते उपस्थित राहणार आहेत.

<><><><>

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या अकोले तालुक्यातले शहीद जवान संदीप गायकर यांच्या पार्थिवावर आज ब्राह्मणवाडा इथं लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. गुरुवारी पहाटे जम्मू-काश्मीरमधील किश्तवाड सेक्टरमध्ये सीमेवर दहशतवाद्यांविरोधात लढताना त्यांना वीरमरण आलं. त्यांच्या बलिदानानं संपूर्ण अकोले तालुका आणि अहिल्यानगर जिल्हा शोकसागरात बुडाला. या वीर जवानाला शेवटची मानवंदना देण्यासाठी प्रचंड गर्दी झाली होती. हजारो नागरिकांनी साश्रू नयनांनी वीर जवानाला निरोप दिला. यावेळी 'भारत माता की जय', 'संदीप गायकर अमर रहे' च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

<><><><>

झारखंडमधल्या लातेहार जिल्ह्यात पोलिसांसोबत काल झालेल्या चकमकीत कुख्यात नक्षलवादी पप्पु लाहोरा याच्यासह तीन नक्षलवादी मारले गेले. लोहारा हा झारखंड जनमुक्ती परिषद या नक्षलवादी संघटनेचा नेता होता. त्याच्यचावर १० लाख रुपयांचं इनाम होतं. झारखंडमधे आता मोजके नक्षलवादी उरले आहेत, असं बोकारो रेंजचे पोलीस महानिरीक्षक मायकेल राज यांनी सांगितलं.

<><><><>

रत्नागिरी जिल्ह्यात बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या १३ बांगलादेशी नागरिकांचं शिक्षेनंतर मायदेशी प्रत्यार्पण करण्यात आलं आहे. पूर्णगड सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या या नागरिकांची सहा महिन्यांची शिक्षा पूर्ण झाल्यानंतर त्यांना मायदेशी पाठवण्यात आलं. भारतात अनधिकृतपणे प्रवेश केल्याप्रकरणी पारपत्र अधिनियम आणि परदेशी व्यक्ती अधिनियमांतर्गत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या सर्व १३

जणांची मायदेशी प्रत्यार्पण करण्याची प्रक्रिया नुकतीच पूर्ण करण्यात आल्याचं रत्नागिरी पोलिसांनी सांगितलं .

<><><><>

क्वालालंपूर इथं सुरु असलेल्या मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीत भारताच्या किदम्बी श्रीकांतनं आज अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्यानं उपांत्य फेरीत जपानच्या युशी तनाका याचा २१-१८, २४-२२ असा पराभव केला.

<><><><>

पोलंड मधल्या चोरझो इथं झालेल्या जानुझ कुसोसिन्की मेमोरियल मीट - २०२५ मध्ये भारताचा ऑलिम्पिक पदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा यानं ८४ पूर्णांक १४ मीटर भालाफेकीसह आज दुसरा क्रमांक पटकावत रौप्य पदक मिळवलं. नीरजची ही सर्वोत्तम कामगिरी सहाव्या आणि शेवटच्या प्रयत्नात झाली. २०२१ नंतरचा हा त्याचा सलग बाविसावा टॉप-टू फेरीचा अनुभव होता. जर्मनीच्या ज्युलियन वेबर यानं ८६ पूर्णांक १२ मीटर भालाफेक करून सुवर्ण पदक, तर ग्रेनेडाचा अँडरसन पीटर्स यानं ८३ पूर्णांक २४ मीटर भालाफेकीसह तिसऱ्या क्रमांकावर रहात कांस्य पदक पटकावलं.

<><><><>

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्जचा सामना दिल्ली कॅपिटल्स सोबत होणार आहे. जयपूर इथं संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होईल.

स्पर्धेत काल लखनऊ इथं झालेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादनं रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा ४२ धावांनी पराभव केला. विजयासाठी २३२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, बंगळुरुचा संघ १९ षटकं आणि ५ चेंडूत १८९ धावाच करू शकला. सामन्याच्या अखेरच्या काही षटकात हैद्राबादच्या गोलंदाजांनी प्रभावी कामगिरी केली. त्यांनी अवघ्या १६ धावांत बंगळुरुचे अखरेचे सात गडी बाद करत हा सामना आपल्या बाजुनं फिरवला.

<><><><>

रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांनी आतापर्यंत प्रत्येकी ३९० कैद्यांना मुक्त केलं आहे. या युद्धात कैद्यांची ही सर्वात मोठी सुटका मानली जात आहे. इस्तंबूल इथं दोन्ही

देशांमध्ये झालेल्या चर्चेनंतर एक सामंज्यस्य करार झाला असून आगामी काळात दोन्ही देशांकडून आणखी काही कैद्यांची सुटका होणार असल्याची शक्यता आहे. सुटका केलेल्या युक्रेनियन कैद्यांना उत्तर चेर्ननिव्हिव्ह इथल्या एका रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तर रशियाचे सुटका केलेले कैदी सध्या बेलारुसमध्ये असून त्यांना रशियामध्ये हलवण्यापूर्वी वैद्यकीय सहकार्य पुरवण्यात येत आहे. परस्पर देशांमध्ये झालेल्या चर्चेदरम्यान सुमारे हजार कैद्यांची सुटका करण्यावर सहमती दर्शवण्यात आली होती.

**<><><>**

भारतानं संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत दहशतवादावरुन पाकिस्तानवर कठोर शब्दात टीका केली आहे. भारत गेल्या अनेक दशकांपासून सीमेपलीकडून होणाऱ्या पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यांना तोंड देत असल्याचं संयुक्त राष्ट्रांमधील भारताचे स्थायी प्रतिनिधी पी. हरीश यांनी म्हटलं आहे. सशस्त्र संघर्षांमध्ये नागरिकांच्या संरक्षणावरील खुल्या चर्चेदरम्यान त्यांनी हे वक्तव्य केलं.

पाकिस्ताननं दहशतवादाला प्रोत्साहन देण्यासाठी वारंवार नागरिकांचा ढाल म्हणून वापर केला, ऑपरेशन सिंदूरमध्ये मारल्या गेलेल्या कुख्यात दहशतवाद्यांच्या अंत्यसंस्कारात पाकिस्तानातील वरिष्ठ सरकारी, पोलिस आणि लष्करी अधिकारी उपस्थित असल्याचं जगानंही पाहिलं असून पाकिस्तानी सैन्यानं या महिन्याच्या सुरुवातीला जाणूनबुजून भारतीय सीमावर्ती गावांना लक्ष्य केलं होतं, असंही पी. हरिश यांनी म्हटलं आहे.

**<><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशात आणि राज्यात विविध ठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्रात **धाराशिव** जिल्ह्यात तिरंगा रॅली काढण्यात आली. रॅलीची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ चौक इथून झाली.  या रॅलीमध्ये महिला, शाळा आणि महाविद्यालयाचे विद्यार्थी, वारकरी, माजी सैनिक, आणि नागरिक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. यावेळी रॅलीत सहभागी झालेल्या नागरिकांनी दिलेल्या प्रतिक्रिया ऐकू या…

**होल्ड…. बाईट**

सोलापुरात देखील तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीत महिला आणि विद्यार्थ्यांसह अनेक नागरिक सहभागी झाले.

**<><><><>**

नैऋत्य मोसमी पाऊस आज वेळेच्या आठ दिवस आधीच केरळमध्ये दाखल झाला असल्याचं भारतीय हवामान विभागानं कळवलं आहे. २००९ नंतर प्रथमच मान्सून एवढ्या लवकर सक्रिय  झाला आहे.

या पार्श्वभूमीवर केरळ, दक्षिण कोकण, कर्नाटकचा किनारपट्टी आणि घाटमाथा, मध्य महाराष्ट्र, गोवा आणि पश्चिम राजस्थानात रेड *ॲलर्ट* जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्र, तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, बिहार आणि आसाममध्ये ऑरेंज ॲलर्ट देण्यात आला आहे.

राज्यात आज मराठवाड्यासह, विदर्भ, कोकणात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मराठवाड्यात नांदेडसह लातूर आणि विदर्भात बुलडाणा, मध्य महाराष्ट्रात पुणे तसंच कोकणात रत्नागिरी जिल्ह्यात यलो *ॲलर्ट* देण्यात आला आहे. या भागात मेघगर्जना, विजांचा कडकडाट-वादळी वाऱ्यांसह हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचा इशारा दिला आहे.

**//<><><><>//**